## फौजदारी जामीन अर्ज नं. ९७८/२०२२

(CNR No. MHSN010036312022)

(अक्षय प्रकाश कदम वगैरे ३ वि. महाराष्ट्र शासन वगैरे २ )

### नि.क्र. १ च्या अर्जावर आदेश

**१.** तिघा आरोपींनी मिळून हा अर्ज फौ.प्र.संहितेच्या कलम ४३९ खाली नियमित जामीनाचा दिला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, विटा पोलीस ठाणे यांचेकडे गु.नों.क्र. ४८६/२०२२ मध्ये त्यांचे विरुद्ध भा.द.वि. कलम ३२३, ५०४ आणि कलम अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम 3(1)(r)(s), 3(2)(va), अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे. त्यांचे पुढे कथन असे की, आम्ही सध्या न्यायालयीन कोठडीत आहोत. आता आमच्याकडून जप्त करण्यासारखे कांहीही नाही. आम्ही पळून जाणार नाही. साक्षीदारांवर दबाव आणणार नाही. आमची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. तरी आम्हाला जामीनावर सोडावे.

**२.** सरकारपक्षातर्फे या अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि. ६ ला दिले आहे. त्यात त्यांचे कथन असे की, जर हा अर्ज मंजूर केला तर, आरोपी साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता आहे. तरी हा अर्ज फेटाळावा.

**३.** मूळ फिर्यादी सुखदेव सकटे याने नि. ८ ला शपथपत्र देऊन असे कळविले की, त्याची या अर्जास कसलीही हरकत नाही.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**५.** खानापूर तालुक्यातील भुड गांवचा रहिवासी सुखदेव केरु सकटे याने ता. ०५.१०.२०२२ ला विटा पोलीस ठाण्यात दिलेल्या वर्दी जबाबाचा थोडक्यात आशय असा आहे की, तो मातंग जातीचा आहे. दस-याचा शिलंगण सोहळा पहावयास तो संध्याकाळी ६.३० च्या सुमारास भुड-जाधववाडी मार्गावर गेला असताना, तिघा आरोपींनी त्यास अंगावर दोरी टाकून अडकविण्याचा प्रयत्न केला आणि खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. 'रस्सीखेच हा खेळ मांगाचा नाही' असे ते त्यास म्हणाले वगैरे.

६. एकंदर हकीकतीवरुन आणि मूळ फिर्यादीची लेखी नाहरकत विचारात घेता, आरोपींना याउपर डांबून ठेवणे न्यायोचित होणार नाही.

वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील आदेश केला आहे.

## आ दे श

१. सदरचा अर्ज मंजूर केला आहे.

२. अर्जदार नं. १ ते ३ यांनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- चा एक लायक जामीनदार आणि तितक्याच रक्कमेचे वैयक्तीक बंधपत्र दिल्यानंतर त्यांची जामीनावर सुटका होईल.

३. अर्जदारांनी सरकारपक्षाच्या साक्षीदारांवर कसल्याही प्रकारे दबाव आणू नये. तसेच पुराव्याचे कामी ढवळाढवळ करु नये.

४. त्यांनी या न्यायालयाच्या पूर्वपरवानगीविना, तपासाचा अंतिम अहवाल येईपर्यंत, सांगली जिल्हयाची हद्द सोडून जाऊ नये.

सही/- xxx

सांगली. (श्री. व्यं. पोतदार )

ता. १७/ १०/२०२२ प्रभारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश, सांगली.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order/Judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Sou. J. A. Pujari (Steno Grade-I) |
| Court | : Ad-hoc DJ-2 & Addl.Sessions Judge, Sangli. |
| Date | : 17/10/2022 |
| Signed by Presiding officer on | : 17/10/2022 |
| Uploaded on | : 18/10/2022 |